## नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०२१ मधील नि.क्र. ५ खालील आदेश

दावा व अर्जातील कथनांचे अवलोकन केले. विद्यावंत वकील श्री. एस. के. नंदगावे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत दावा हा हक्कज्ञापनाकरिता व कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी असे दिसून येते की दावा जमिनीमध्ये वादींचे हक्क व हितसंबंध आहेत. दावा जमिनीचे ७/१२ पत्रकी वादी व प्रतिवादी क्र. २ ते ४ यांची समाईकात नोंद आहे. वादीचे असे म्हणणे आहे की वादीची कोणतीही लेखी संमती न घेता प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ चे नावे तथाकथित दस्त करून दिलेचे समजलेनंतर वादीने महसूल न्यायालयात तक्रार दाखल केली असून सदर प्रकरण महसूल न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. तथापि, तथाकथित खरेदीपत्राप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ ला कब्जा दिला नव्हता व नाही. असे असता प्रतिवादी क्र. १ ने दावा जमिनीत बेकायदेशीर व विनापरवाना बांधकाम करण्याच्या उद्देशाने पाया खुदाई सुरू केली. वादीची कथने व कागदपत्रे विचारात घेता मी या अनुमानास येते की सकृतदर्शनी प्रतिवादी क्र. १ हे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना दावा जमिनीत बेकायदेशीर व विना परवाना बांधकाम करत आहेत. सकृतदर्शनी वादीला केस आहे या अनुमानास मी येते. जर एकतर्फा आदेश केला नाही तर प्रतिवादी क्र. १ हे दावा जमिनीत बांधकाम करू शकतात व त्यामुळे वादींचे पैशाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी हे तुर्तातुर्त एकतर्फा मनाई आदेश मिळणेस पात्र आहेत या अनुमानास मी येते. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करते -

### आदेश

प्रतिवादी क्र. १ अगर तर्फे इसमांनी दावा जमिनीत कोणतेही बांधकाम करू नये असा प्रतिवादी क्र. १ चे विरूध्द पुढील तारखेपर्यंत एकतर्फा तुर्तातुर्त मनाई आदेश देणेत आला.

Digitally signed by Yamini Dilip Boravke
Date: 2021.03.16 11:52:50 +0530

दिनांक – १०.०३.२०२१

(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गडहिंग्लज